नि.दि.वाद क्र.४६/२००९
गोपाल वि. ललिता

## आदेश नि.७१ वर

१. वादीने दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज आणि प्रतिवादीने त्यावर दाखल केलेले म्हणणे यांचे अवलोकन केले.

२. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रस्तुत अर्जाव्दारे वादीने प्रकरणामध्ये काही महत्वाची कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी मागितली आहे.

४. सदर अर्जाला प्रतिवादीने आक्षेप घेवुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

५. प्रकरणाचे स्वरूप विचारात घेता वादीने जी दस्त प्रकरणात दाखल करून घेण्याची विनंती केली आहे. सदरचे दस्त प्रकरणाचा निकाल गुणदोषावर लावण्यासाठी मदत करणारे आहेत. तसेच त्या दस्तावर प्रतिवादीला वादीची उलट तपासणी घेण्याची देखिल संधी आहे. या सर्व बाबीचा विचार करता वादीला सदर दस्त प्रकरणात दाखल करण्याची परवानगी देणे आवश्यक ठरते. या कारणास्त वादीचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

स्वा
दि.११/०६/२०१९ ( एस.पी.शिंदे )
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,वाशिम